हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

मासिक

# नवस्नेह

स्थापना : १९६४

६१

वर्ष ११ वे : अंक १२
मार्च २०२६





प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# गीतरामायणाचे रामायण !




गीत रामायण हा एकाच कवीने वर्षभर रचलेला, एकाच संगीतकाराने संगीतबद्ध केलेला, वर्षभर अखंडितपणे चाललेला आकाशवाणीच्या इतिहासातील एकमेव, अभूतपूर्व असा संगीत कार्यक्रम ठरला. १ एप्रिल १९५५ ते १९ एप्रिल १९५६ पर्यंत तो पुणे आकाशवाणीने प्रसारित केला. साधारण १९५३ साली पुणे आकाशवाणी हे केंद्र सुरू झाले. श्री सीताकांत लाड नावाचे गदिमांचे मित्र कार्यक्रम नियोजक म्हणून पुण्याला आले होते. नभोवाणीसाठी काहीतरी सातत्याने लिहावे, असा त्यांनी गदिमांना खूप आग्रह केला आणि एका महाकाव्याचा जन्म झाला. रामायणात वाल्मिकींनी २८००० श्लोकांत रामकथा लिहिली आहे. गदिमांनी तीच रामकथा एकूण ५६ गीतांत शब्दबद्ध केली आहे.

माडगूळकरांनी श्रीराम कथेचा भाग एकेका रामायणी व्यक्तीच्या तोंडून गीतातून प्रकट केला आहे. या कथाभागात एकूण २७ व्यक्ती येतात. सर्वाधिक दहा गीते ही श्रीराम या चरित्र नायकाच्या तोंडी आहेत. त्या खालोखाल सीतेची आठ, कौसल्या व लव – कुश प्रत्येकी तीन, दशरथ, विश्वामित्र, लक्ष्मण, विहाग प्रत्येकी दोन, अशा या २६ रचना सोडल्या तर उर्वरित ३० स्वररचना या २६ रागांत एकेक व दोन लोकगीतांवर आधारित आणि दोन स्वतंत्रपणे निर्मित आहेत. २६ रागांत भूप, मिश्र देशकार, देस, विभाग, विहाग, मिश्र भैरव, मिश्र बहार, मधुवंती, तोडी, मिश्र खमाज, जोगकंस, अडाणा, यमन, कल्याण, मिश्र हिंडोल, शुद्ध सारंग, ब्रिदावनी सारंग, मुलतानी, तिलंग, मालकंस, सारंग, हिंडोल, मिश्र आसावरी, यमनी बिलावल, शुद्ध कल्याण व मिश्र पहाडी यांचा समावेश आहे.

आकाशवाणीने प्रसारित केलेल्या गीतरामायणाचे निवेदन पुरुषोत्तम जोशी यांनी केले आहे.

गायक व गायिका :

सुधीर फडके, माणिक वर्मा, राम फाटक, वसंतराव देशपांडे, व्ही.एल.इनामदार, सुरेश हळदणकर, बबनराव नावडीकर, चंद्रकांत गोखले, गजानन वाटवे, ललिता फडके, मालती पांडे, प्रमोदिनी जोशी, मंदाकिनी पांडे, योगिनी जोगळेकर, कुमुदिनी पेडणेकर, लता मंगेशकर, सुमन माटे, जानकी अय्यर, सौ. जोग.

वादक :

प्रभाकर जोग, अप्पा इनामदार, अण्णा जोशी, सुरेश हळदणकर, केशवराव बडगे

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

मासिक नवस्नेह

# नवस्नेह

**वर्ष ११ वे : अंक १२ : मार्च २०२६**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय /४**

२) **विज्ञानाला आजही न उलगडलेले 'नाच्चियार कोईल' चे रहस्य /५**

३) **गोपिकाबाई फडके /८**
– वैदेही जोशी

४) **ज्ञानसूर्याची सावली /१०**
– सौ. मंजुश्री गोखले

५) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' /१३**
– सौ. मंजुश्री गोखले

६) **मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा /१६**
– ओंकार गाडगीळ

७) **मनाला खुपणारं कागदावर /१८**
– कमला हर्डीकर

८) **भारतरत्न विनायक नरहर भावे /२१**
– विकास मेहंदळे

९) **वधूवर माहिती यादी /२५**



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

तुमची पण परीक्षा सुरू आहे ना? जवळपास महिनाभर असेल. मित्रांनो, आजकाल या दहावी-बारावीच्या परीक्षा महिना-महिना चालतात. सगळ्यांना महिनाभर टेन्शन ! विद्यार्थी, पालक, शिक्षक, पर्यवेक्षक, मॉडरेटर, पोलीस सगळ्यांना ! पूर्वी कसं बरं होतं. चार दिवसांत परीक्षा संपायची, की सगळेच मोकळे ! पण हल्ली ना प्रत्येक गोष्टींचा इव्हेन्ट करायचा ट्रेण्ड आहे. मग परीक्षांचा इव्हेन्ट चार दिवसात संपून कसा चालेल. तो महिनाभर तर चाललाच पाहिजे. पण हे इव्हेन्टचं खूळ कितीपर्यंत पोचलंय माहित आहे का? परवा एके ठिकाणी वाचलं, 'वडिल गेले त्याच्या दहाव्या दिवसाचा इव्हेन्ट आहे.' मी थक्क! असो. पण परीक्षा मात्र नीटच दिली पाहिजे हं ! सगळ्यांनीच ! विद्यार्थ्यांनी अभ्यासाची तर आई वडिलांनी पालकत्वाची ! अर्थात

**जो उडने का शौक रखते है ।**
**वो गिरने का खौफ नही रखते ।**
**अंदाजा सिर्फ ताकद का लगाया**
**जा सकता है ।**
**इन्सान के हौसलों का नही ।**

हे तर खरंच !

मित्रांनो, थंडी कमी होत आहे. झाली आहे. आता या वर्षीचा उन्हाळा काय म्हणतोय बघायचं! अर्थात फॅन, एसी यांच्यासोबत मनाला थंडावा देणारा आपला नवस्नेह आहेच ! नवनवीन मजकुरासह ! मित्रांनो, या रामनवमीपासून आम्ही एक नवीन उपक्रम सुरू करतो आहोत. या अंकापासून आपण आधुनिक वाल्मिकी गदिमां लिखित गीत रामायणाचं एकेक गाणं क्रमानं आपल्या अंकात देतो आहोत. गीत रामायणातील सगळीच गाणी आपल्याला माहित आहेत असं नाही. थोडीच गाणी माहित आहेत. पण प्रत्येक गाण्यात शब्दप्रभू गदिमांच्या प्रतिभेची कमाल आहे. ते शब्दसौंदर्य वाचूनच समजेल. म्हणून हा उपक्रम सुरू करतो आहोत. तुम्हाला नक्की आवडेल. असो.

नवस्नेहमध्ये आपली इतरही सदरे आहेतच. पण एक माहिती अशी दिली आहे जिचं उत्तर आजही विज्ञानाला सापडत नाही. ''नाचियार कोईल'' असं विचित्र नांव असलेल्या मंदिराचे रहस्य. जरूर वाचा. अशी ठिकाणं आपण बघायला सहसा जात नाही म्हणून ही खास माहिती तुमच्यासाठी.

मित्रांनो, आता परिक्षा संपतील सगळ्यांच्या! मग ट्रीपला जाण्याचे बेत ठरतील. अशी काही हटके ठिकाणं शोधून तिथं जाण्याचे बेत ठरवा. खूप काहीतरी वेगळं बघितल्याचं समाधान मिळेल. अर्थात 'पसंद अपनी अपनी, खयाल अपना अपना !' फक्त ट्रीपच्या ठिकाणी सावधगिरी मात्र कटाक्षाने बाळगा ! तुम्ही म्हणाल आज काय सगळ्या सूचनाच आहेत वाटतं ! तेव्हा थांबते.

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# विज्ञानाला आजही न उलगडलेले 'नाच्चियार कोईल'चे रहस्य



भारतीय संस्कृती ही केवळ मंदिरे आणि पूजा-अर्चा यापुरती मर्यादित नसून, ती मानवी तर्काच्या पलीकडे असलेल्या अनेक गूढ रहस्यांचे माहेरघर आहे. आज विज्ञानाने चंद्रावर आणि मंगळावर पाऊले टाकली असली, तरी आपल्याच देशात, तामिळनाडूच्या कुंभकोणम सारख्या प्राचीन शहरात अशी काही आध्यात्मिक शक्तीस्थळे आहेत, जिथे विज्ञानाचे नियम थिजतात आणि श्रद्धेचा विजय होतो. याच कुंभकोणम जवळील 'थिरुनरैयूर' या गावात वसलेले 'नाच्चियार कोईल' हे मंदिर जगभरातील लोकांसाठी एक न सुटलेले कोडे बनले आहे.

भगवान विष्णूंचे वाहन 'गरुड देव' यांची पाषाण मूर्ती, जिला स्थानिक भाषेत 'कल गरुड' असे म्हणतात, ती या मंदिराचे मुख्य आकर्षण आहे. 'कल' म्हणजे तामिळ भाषेत दगड. या दगडी गरुड देवाच्या मूर्तीबद्दल जे घडते ते ऐकून आणि पाहून भल्याभल्या नास्तिक लोकांचाही विश्वास डगमगू लागतो. वर्षातून दोनदा, म्हणजेच मार्गशीर्ष आणि फाल्गुन महिन्यात जेव्हा या गरुड देवाची उत्सवमूर्ती गाभाऱ्यातून बाहेर काढली जाते, तेव्हा निसर्गाच्या आणि विज्ञानाच्या विरोधात जाणारी एक घटना घडते. जेव्हा गरुड देवाची मूर्ती गाभाऱ्यात असते, तेव्हा ती इतकी हलकी असते की केवळ ४ पुजारी ती सहजपणे उचलून खांद्यावर घेऊ शकतात. मूर्ती अगदी फुलासारखी हलकी वाटते. मात्र, जशी ही मूर्ती गाभाऱ्याचा उंबरठा ओलांडून बाहेरच्या दिशेने प्रवास सुरू करते, तसे या निर्जीव दगडाचे वजन कोणत्याही बाह्य कारणाशिवाय वाढू लागते.

हे वजन वाढणे इतके जलद आणि गणितीय प्रमाणात असते की, गाभाऱ्याबाहेर आल्यावर ती उचलण्यासाठी ८ लोकांची गरज लागते. थोडे अंतर कापून मंदिराच्या पहिल्या प्रांगणात येईपर्यंत वजन दुप्पट होते आणि १६ लोक लागतात. त्यानंतर ३२ आणि मंदिराच्या मुख्य गोपुराच्या बाहेर रस्त्यावर येईपर्यंत या मूर्तीचे वजन इतके प्रचंड वाढते की, ते पेलण्यासाठी तब्बल ६४ धष्टपुष्ट आणि बलदंड माणसांना खांदा द्यावा लागतो. हे दृश्य पाहणाऱ्याच्या

डोळ्यांचे पारणे फेडणारे असते, कारण ६४ माणसे मिळूनही त्या मूर्तीचा भार सोसताना त्यांची दमछाक होत असते.

याहूनही अधिक आश्चर्यकारक बाब म्हणजे, या प्रक्रियेदरम्यान त्या काळ्या पाषाणाच्या मूर्तीवर घामाचे बिंदू जमा होताना अनेकांनी पाहिले आहे. कडक उन्हाळा असो वा हिवाळा, जेव्हा ६४ माणसे ती मूर्ती उचलतात, तेव्हा गरुड देवाच्या अंगावरून घामाच्या धारा वाहतात, ज्या पुजाऱ्यांना वारंवार रेशमी वस्त्राने पुसाव्या लागतात. विज्ञानाच्या दृष्टीकोनातून दगडाला घाम फुटणे किंवा त्याचे वस्तुमान बदलणे अशक्य आहे, परंतु इथे हा प्रकार शेकडो वर्षांपासून अविरत सुरू आहे. जेव्हा परतीचा प्रवास सुरू होतो, म्हणजेच गरुड देव पुन्हा मंदिरात प्रवेश करतात, तेव्हा हे वजन अगदी उलट क्रमाने कमी होऊ लागते. ६४ वरून ३२, १६, ८ आणि शेवटी गाभाऱ्यात ठेवताना केवळ ४ माणसे उरतात.

या अद्भुत घटनेमागे केवळ चमत्कार नाही, तर एक अत्यंत रंजक आणि हृदयस्पर्शी पौराणिक कथा दडलेली आहे. पुराणात सांगितल्यानुसार, हे ठिकाण पूर्वी 'गंधादन' वन म्हणून ओळखले जात असे. येथे मेधावी नावाचे एक महान ऋषी तपश्चर्या करत होते. त्यांना अपत्य नव्हते, म्हणून त्यांनी महालक्ष्मीची आराधना केली. एके दिवशी त्यांना वंजुल वृक्षाखाली एक लहान मुलगी सापडली. ऋषींनी तिचा सांभाळ आपल्या मुलीप्रमाणे केला आणि तिचे नाव 'वंजुलवल्ली' ठेवले. जेव्हा वंजुलवल्ली लग्नाच्या वयात आली, तेव्हा स्वतः भगवान विष्णू गरुडावर बसून तिच्याशी विवाह करण्यासाठी तिथे आले. पण एका कन्येच्या पित्याला, मेधावी ऋषींना, आपल्या लाडक्या मुलीला सासरी पाठवताना काळजी वाटत होती. म्हणून ऋषींनी भगवान विष्णूंकडे एक अट घातली. ते म्हणाले, हे प्रभू, जर तुम्हाला माझ्या मुलीशी विवाह करायचा असेल, तर या घरात आणि या मंदिरात माझ्या मुलीचा शब्द अंतिम असेल, तिला तुमच्यापेक्षाही पहिला मान मिळेल. भक्ताच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या विष्णूंनी हे मान्य केले. म्हणूनच या मंदिराला 'नाच्चियार कोईल' असे म्हणतात. 'नाच्चियार' म्हणजे सन्माननीय स्त्री किंवा राणी. आजही या मंदिरात प्रसादापासून ते पूजेपर्यंत पहिला मान देवीला दिला जातो.

आता या कथेचा आणि गरुड देवाचे वजन वाढण्याचा काय संबंध? तर त्याचा संबंध 'वचनपालनाशी' आहे. गरुड हे भगवान विष्णूंचे वाहन आहे आणि त्याचा वेग मनापेक्षाही जास्त आहे असे मानले जाते. जेव्हा उत्सवात विष्णू आणि देवीची पालखी निघते, तेव्हा गरुड देवाला माहित असते की जर आपण आपल्या खऱ्या वेगाने उडालो किंवा चाललो, तर आपण देवीच्या पालखीच्या पुढे निघून जाऊ आणि आपल्या स्वामींनी ऋषींना दिलेले देवीला पहिला मान देण्याचे वचन मोडले जाईल. हे होऊ नये म्हणून, आपल्या स्वामींच्या शब्दाचा मान राखण्यासाठी गरुड देव मुद्दाम स्वतःचे वजन वाढवतात. ते इतके जड होतात की त्यांना उचलणाऱ्यांची आणि पर्यायाने त्यांची स्वतःची गती मंदावते. यामुळे देवीची पालखी नेहमी गरुडाच्या पुढे राहते. शक्तीशाली असूनही केवळ दुसऱ्याच्या सन्मानासाठी आणि स्वामींच्या वचनासाठी स्वतःला जड करून घेणारा आणि गती कमी करणारा गरुड देवासारखा विनम्र भक्त शोधून सापडणार नाही.

या मंदिराची निर्मिती कथा सुद्धा अतिशय रहस्यमय आहे. असे मानले जाते की, कित्येक शतकांपूर्वी एका शिल्पकाराला गरुड देवाची मूर्ती बनवण्याचा दृष्टांत झाला होता. तो जेव्हा मूर्ती घडवत होता, तेव्हा ती मूर्ती पूर्ण होताच अचानक आकाशात उडू लागली. शिल्पकार घाबरला आणि त्याने हातातील छिन्नी त्या मूर्तीवर फेकून मारली. ती छिन्नी लागताच ती उडणारी मूर्ती पुन्हा दगडाची झाली आणि तिथेच पडली, जी आज आपण मंदिरात पाहतो. आजही या मूर्तीच्या नाकावर त्या छिन्नीचा छोटासा घाव दिसतो, असे स्थानिक लोक सांगतात... अर्थात ही लोककथा आहे... या मंदिरात गरुड देवाची पूजा नऊ ग्रहांचे दोष


निवारण्यासाठी केली जाते. येथे गरुड देवाला ‘विष्णू चित्त’ मानले जात असल्याने त्यांना अत्यंत मौल्यवान पितांबर, रेशमी वस्त्रे आणि सोन्याचे दागिने अर्पण केले जातात. इतर ठिकाणी साध्या रूपात दिसणारे गरुड देव, येथे मात्र एखाद्या राजाप्रमाणे भरजरी वस्त्रात आणि अलंकारात सजलेले असतात, ज्यांचे दर्शन घेण्यासाठी भाविक गर्दी करतात.

या मंदिराची वास्तुकला देखील तितकीच थक्क करणारी आहे. हे मंदिर चोल आणि नायक राजांच्या काळात बांधले गेले असून, द्रविड शैलीचा हा उत्कृष्ट नमुना आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार, ज्याला राजगोपुर म्हणतात, ते सुमारे ७५ फूट उंच आणि ५ मजली आहे. मंदिराच्या आत अनेक मोठे मंडप आहेत, ज्यांच्या खांबांवर अत्यंत सुबक कोरीव काम केलेले आहे. विशेष म्हणजे, हे एकमेव असे मंदिर आहे जिथे गरुड देवाला इतके महत्त्वाचे स्थान आहे. येथे गरुड देवाच्या अंगावर नऊ सर्प (नाग) आहेत, जे नवग्रहांचे प्रतिनिधित्व करतात, त्यामुळे येथे नवग्रहांची वेगळी पूजा करण्याची गरज पडत नाही. उत्सवाच्या दिवशी मंदिराचे वातावरण पूर्णपणे भारलेले असते. मार्गशीर्ष आणि फाल्गुन महिन्यातील ‘गरुड सेवे’च्या दिवशी हजारो भाविक गोविंदा... गोविंदा... असा जयघोष करत असतात. वाद्यांचा गजर, कापूर आणि अगरबत्तीचा सुगंध, आणि ६४ लोकांनी उचललेला तो भव्य गरुड जेव्हा मंदिराबाहेर येतो, तेव्हा तो क्षण प्रत्येकाच्या डोळ्यांत साठवण्यासारखा असतो. ज्यांना विज्ञानाचा अहंकार आहे, त्यांनी एकदा तरी या उत्सवाला हजेरी लावून तो अनुभव घ्यावा. ६४ पहिलवान जेव्हा घामाने थबथबतात आणि त्यांच्या खांद्यावरचा भार वाढल्याचे त्यांच्या देहबोलीतून दिसते, तेव्हा ते नाटक वाटत नाही तर ते एक वास्तव असते. विज्ञानाला जिथे प्रश्नांची उत्तरे सापडत नाहीत, तिथे श्रद्धेचा प्रवास सुरू होतो. ‘नाच्चियार कोईल’चा ‘कल गरुड’ हा मानवी बुद्धीच्या पलीकडचा विषय आहे. तो दगड आहे की जिवंत देव, हे ज्याचे त्याने अनुभवायचे आहे. पण एक गोष्ट मात्र नक्की, शेकडो वर्षांपासून न थांबलेला हा वजनाचा खेळ आणि घामाच्या धारा, काहीतरी अद्वैत आणि दिव्य शक्ती अस्तित्वात असल्याची साक्ष देतात.

– आंतरजालावरून

**दिनविशेष मार्च २०२६) विश्वावसूनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**फाल्गुन-चैत्र १९४७-४८** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**




**सोमवार दि. २ :** हुताशनी पौर्णिमा, **मंगळवार दि. ३ :** धूलिवंदन, **बुधवार दि. ४ :** वसंतोत्सवारंभ, **गुरुवार दि. ५ :** संत तुकाराम बीज, **शुक्रवार दि. ६ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.१२ वा.), शिवजयंती (तिथी), **रविवार दि. ८ :** रंगपंचमी, **मंगळवार दि. १० :** सावित्रीबाई फुले पुण्य., **बुधवार दि. ११ :** छ.संभाजीराजे बलिदान दिन, **गुरुवार दि. १२ :** छ.राजाराम महा.पुण्य., **रविवार दि. १५ :** संत श्रीबाळूमामा उत्सव, **गुरुवार दि. १९ :** गुढीपाडवा, **शुक्रवार दि. २० :** स्वामी समर्थ प्रकट दिन, **शनिवार दि. २१ :** रमजान ईद, **सोमवार दि. २३ :** श्री ज्योतिर्लिंग षष्ठी यात्रा, **गुरुवार दि. २६ :** श्रीरामनवमी, **मंगळवार दि. ३१ :** श्री महावीर जयंती.

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**

# गोपिकाबाई फडके



भारतीय स्वातंत्र्य लढ्यात प्रत्यक्ष सहभाग असणाऱ्या ब्राह्मण भगिनी होत्याच पण अप्रत्यक्ष रित्या सहभागातून स्वातंत्र्य लढ्याला बळकटी देणाऱ्या अन् त्यागाची परिसिमा गाठून आपले जीवन देशासाठी समर्पित करणाऱ्या अनेक भगिंनीना मनापासून वंदन करणं आपले प्रथम कर्तव्य.

**अशाच एका समर्पित आयुष्याची ओळख ...**

वासुदेवराव अनेक वेळा केव्हाही घरी येत आणि रात्री बेरात्री बाहेर पडत. या सर्वच गोष्टी त्याना संभाळाव्या लागत. आपल्या पत्नीविषयी आपले मनोगत वासुदेवरावांनी व्यक्त केले आहे. ते म्हणतात, 'माझे क्रांतिकार्य सुरु झाल्यापासून एक पैशाचे सोने किंवा रुपये किंवा पितळेचे भांडे विकत घेतले नाही असे म्हणावयास हरकत नाही. परंतु या बायकोसारखी शांत, फार न बोलणारी व समजूतदार बायको दहा लक्ष बायकातसुध्दा मिळणे कठीण. लग्न झाल्यापासून कोणत्याच रितीने हिच्यापासून आजपर्यंत दुःख झाले नाही. तिच्या गुणांचे वर्णन करीन तितके थोडे !'

त्या काळात आपल्या पत्नी विषयी इतक्या सार्थ भावाने बोलले आहेत क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके अन् ती माऊली होती वासुदेवरावांची द्वितीय पत्नी गोपिकाबाई...

वासुदेव बळवंत फडके यांची द्वितीय पत्नी गोपिकाबाईंच्या कुटुंबावर जुन्या वळणाची छाप होती. लहानपणापासून त्यांचा टापटिपीचा अन् शांत स्वभाव. या गोष्टी लहान लहान कामामधे दिसून येत असत. सहनशक्ती अन् पाठांतराची तल्लख बुध्दी ही विशेष उल्लेखनीय होती. फुलते हे त्यांचे आडनाव. वासुदेवरावांशी लहानपणीच त्यांचा विवाह झाला.

त्यावर्षीच त्यांचे वडील मरण पावले. हा त्यांच्या आयुष्यातील पहिला दुःखाचा प्रसंग. त्यानंतर त्यांना असे अनेक दुःखाचे पर्वत सहन करावे लागले. विवाह झाल्यानंतर आपल्या लहान दिराशी त्यांना जमवून घ्यावे लागले. संसाराची सुरुवात आणि वासुदेव बळवंतांच्या क्रांतिजीवनाची सुरुवात जवळ जवळ एकदमच सुरू झाली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जीवन वाहून घेतलेल्या वासुदेवांची घराकडे लक्ष देण्याची वृत्ती कमीच होती. त्यामुळे घरात पैशाची चणचण नेहमीच भासत असे. पण गोपिकाबाई इतक्या सहनशील होत्या की त्यानी आपले गाऱ्हाणे कधीच कोणासमोर मांडले नाही. त्या काळी स्त्रियांना दागिने, उंची लुगडी यांचे मोठे आकर्षण होते. पण अशा सुखासाठी गोपिकाबाईनी आपल्या पतीजवळ कधीच शब्द टाकला नाही. लहानपणीच त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी पडली. त्यातच भर म्हणून की काय, वासुदेवांच्या इच्छेप्रमाणे आपल्या समवयस्क असलेल्या दिराबरोबर त्यानी लेखन, वाचन आणि अमरकोषाचे संस्कृत पाठांतर केले. त्यांच्या पतीने त्यांना घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, नेम धरणे इत्यादी विद्या शिकविल्या. आपला नवरा इतर सामान्य नवऱ्यांपेक्षा खूप वेगळा आहे. त्याच्या विचारांची, ध्येयाची वेगळी धाटणी

आहे. इतर सर्वसामान्य संसारासारखा आपला संसार असणार नाही. हे गोपिकाबाई जाणून होत्या त्यामुळे जग काय विचार करते यापेक्षा आपल्या देशभक्तीने भारलेल्या सहचाराला काय अपेक्षित आहे त्याचा विचार त्या जास्त करत. त्या ज्या वाड्यामध्ये राहत होत्या त्या वाड्याच्या मागील बाजूस एक मोठे वडाचे झाड होते. त्याच्या फांदीला निशाण बांधून त्यावर बंदुकीच्या गोळीचा नेम मारण्यास वासुदेवराव त्याना शिकवित असत. आपल्या सवतीच्या मुलीला त्यांनी आईचे प्रेम दिले. वासुदेवराव अकारणपणे व्रतवैकल्यामध्ये एकरूप होत, तेव्हा त्यांचे सोवळे, त्यांची वृत्ती आणि आचार संभाळता संभाळता गोपिकाबाईंना खूप धावपळ करावी लागली. पण शांतपणे त्या सर्व प्रकारांना सामोरे जात असत.

अनेक वेळा वासुदेवराव मध्यरात्रीच्या काळोखात बाहेर जाऊन बसत. आणि तासन् तास विचार करीत असत. गोपिकाबाईनी विचारले तर त्यांना ते स्पष्ट करीत इंग्रजांचे राज्य नष्ट केल्यावाचून मला शांती मिळणार नाही. वासुदेवरावांनी क्रांतिलढ्यामध्ये संपूर्ण झोकून देण्याच्या आधी त्यानी बाईंना विचारले. माझ्या मागे तू काय करशील? त्यावर बाईंनी उत्तर दिले. तुमच्या मागे मी एक महिनाभर देखील जिवंत राहणार नाही. बाईंच्या या उत्तरावर वासुदेवरावांचा पूर्ण विश्वास होता म्हणून क्रांतिलढ्यात झोकून देण्याआधी वासुदेवरावांनी बाईंना जुन्नर येथे पोहचवण्याचे ठरवले. पतीशी झालेली हीच शेवटची भेट. त्यानंतर त्या आपल्या पतीला कधीच भेटू शकल्या नाहीत. पाहू शकल्या नाहीत.

आपल्या पत्नीला जुन्नर येथे पाठवून दिल्यानंतर वासुदेवरावानी आपल्या उठावाला वेग दिला. इंग्रजांची पथके त्यांच्या मागे लागली. एका बाजूला ही घोडदौड चालू असताना सरकारी हस्तकांच्या ससेमिऱ्यांनी बाई हैराण होऊ लागल्या. पत्नीला पकडले तर वासुदेवराव पोलिसांच्या तावडीत सापडतील या कल्पनेने बाईंना जुन्नरपासून शिरढोणला नेण्याचे निश्चित केले. हृदयशून्य सोल्जरांच्या आणि घोडेस्वारांच्या पहाऱ्यामध्ये बाईना शिरढोण येथे नेण्यात आले. पण संपूर्ण उठावाच्या काळात वासुदेवराव बाईंना कधीच भेटले नाहीत.

वासुदेवरावांना पकडल्यानंतर काळ्या पाण्याची शिक्षा सुनावण्यात आली. आपल्या पतीला पहावे ही त्यांची अंतरीक तळमळ होती पण केवळ निरुपायाने त्यांचे सासरे एकटेच आपल्या पुत्राला भेटावयास गेले. आपल्या पतीला शेवटची पाहण्याची त्यांची इच्छा अपुरीच राहिली.

समाज, आसपासची मतलबी लोकं काय वाट्टेल ते बोलत पण आपले धैर्यवान आणि शूर पती मृत्यूलाही पराभूत करून परत येतील अशी त्यांना आशा वाटत होती. पण १८८३ च्या १९ फेब्रुवारीला त्यांच्या पतीविषयीचे वृत्त त्यांना कळाले. १७ फेब्रुवारीला वासुदेवराव हे जग सोडून निघून गेले होते. हा त्यांच्या दुःखावर पडलेला महान पर्वत होय. यामुळे त्या पूर्णतः कोसळून गेल्या. त्यानंतर त्या अबोल वृत्तीनेच शिरढोण येथे वावरू लागल्या. शेवटपर्यंत त्यांची शरीरयष्टी काटक होती. १८९६-९७ मध्ये दसऱ्याच्या दिवशी आपटे या गावी दसऱ्याचा मोठा समारंभ झाला. तेव्हा गावकऱ्यांनी बाईसाहेब यांना फार आग्रह केल्यामुळे बाईंनी दांडपट्ट्याचे काही हात करून दाखवले.

प्रकृतीने त्या जरी क्षीण झाल्या होत्या तरीही त्यांचा जोर वाखाणण्यासारखा होता. वैधव्याची ५७ वर्षे खडतर जीवनात घालवल्यानंतर २१ सप्टेंबर १९४० साली त्यांचे प्राण पंचत्वात विलीन झाले.

आपल्या जीवनसाथीच्या देशप्रेमाच्या तीव्र भावनांना आपल्या समजून त्याच भावनेने आपले आयुष्य देशासाठी व्यतीत करणारी ही माऊली नेहमीच वंदनीय ठरते.

**– वैदेही जोशी**

मोबा. ९५४५६३५४६५

**शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा**

# ज्ञानसूर्याची सावली

**(लेखांक सत्तेचाळिसावा)**

गीतापाठ म्हणून झाल्यानंतर चौघांनी पुन्हा एकवार गोपाळकृष्णाला नमस्कार केला. झोपाळ्यावर बसलेल्या मामाआजोबांना लांबून दंडवत घातला. माजघराच्या दाराशी उभ्या असलेल्या मामीआजीलाही नमस्कार केला. आता रात्र झाली होती. मामाआजीनं चौघांनाही जेवण वाढून दिलं. जेवणं झाली. चालून थकलेले पाय बोलायला लागले. लहानगी मुक्ता पटकन निजली. निवृत्ती, ज्ञानेश्वर पैठणच्या धर्मसभेबद्दल बोलत असताना डोळे मिटून पडलेला सोपान चटकन उठून बसला. त्याच्या डोळ्यांत किंचित भय दिसत होतं. निवृत्तीदादानं विचारलं, ''का रे सोपाना! का उठून बसलास ? पाय जास्त दुखतात का? नीज येत नाही का?'' पण सोपानाचं दादाच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. अचानक त्यानं निवृत्तीदादाचा हात धरला आणि म्हणाला, ''दादा, पैठणच्या धर्मसभेनंसुद्धा आपल्याला नाकारलं, शुद्धिपत्र दिलं नाही, तर आपण काय करायचं? की समाजानं टाकलेलं ग्रामण्य सांभाळत असंच जगत राहायचं? काय करायचं रे आपण?''

सोपानाच्या प्रश्नानं निवृत्तीदादा विचारात पडला; पण उत्तर ज्ञानादादानं दिले. तो म्हणाला, ''पैठणच्या धर्मसभेत आपल्याला नाकारलं आणि शुद्धिपत्र दिलं नाही, तर आपण काशीला महासभेत जाऊ. तिथं आपलं गाऱ्हाणं मांडू. आपल्या आई-बाबांनी भगवान पाराशर ऋषींच्या शास्त्रार्थाप्रमाणे तीन कृच्छे, तीन चांद्रायणे आणि जातकर्मादी संस्कार करून तर प्रायश्चित्त घेतलं होतंच, पण आळंदीच्या धर्मसभेनं सांगितलेलं देहान्त प्रायश्चित्तसुद्धा घेतलेलं आहे. तिथं जाऊन हे सगळं विशद करू आणि काशीतल्या ब्रह्मवृंदाकडे न्याय मागू.''

ज्ञानेशाचा स्वर ठाम होता. निवृत्तीदादालाही ते पटलेलं असावं; पण सोपानाच्या मनात पुन्हा एक प्रसंग आला. ''निवृत्तीदादा, ज्ञानादादा, मी सारखे प्रश्न विचारतो आहे, म्हणून रागवू नका. आपण उच्च कोटीची ज्ञानसाधना करून समाजाला शहाणं करावं, ही बाबांची इच्छा होती. मग किती दिवस ? आणखी किती दिवस आपलं आयुष्य शुद्धिपत्र आणण्यासाठी आपण खर्ची घालायचं? काशीला जाणं, ही सहजसाध्य गोष्ट नाही. ज्ञानसाधनेसाठी आपण आसुसलेलं असताना आणि समाजाला उद्बोधित करण्याचं आपलं कर्मकर्तव्य आहे, असं ठरवलेलं असताना आपण शुद्धिपत्र आणण्यामध्ये आयुष्याचा किती काळ खर्ची घालावयाचा? मी तुम्हा दोघांपेक्षा लहान आहे, सान आहे, अजाण आहे, तरीही माझ्या मनाला हे संयुक्तिक वाटत नाही.'' आपल्या मनातली शंका व्यक्त करून सोपानानं खाली मान घातली. कदाचित आपला हा प्रश्न चुकीचा असेल, या विचारानं तो खाली मान घालून बसला; पण निवृत्तीदादाला सोपानाचा विचार पटला असावा. तो लगेचच म्हणाला, ''तुझा विचार योग्य आहे सोपाना. काशीला जाऊन शुद्धिपत्र आणण्याची वेळ आपल्यावर येऊ नये, अशा पद्धतीनं पैठणच्या धर्मसभेला आपण आपलं गाऱ्हाणं समजावून सांगितलं पाहिजे. त्यासाठी काहीतरी करावं!''

आता ज्ञानेशालाही हा विचार पटला असावा. तो म्हणाला, ''निवृत्तीदादा, सोपाना, तुम्हा दोघांचाही विचार संयुक्तिक आहे; पण आळंदीच्या

धर्मसभेनंही सगळी धर्मशास्त्रं, सगळे शास्त्रार्थ, सगळे शास्त्राधार पाहिले आहेत आणि त्यात त्यांना कोणताच मार्ग सापडला नाही. कदाचित पैठणच्या धर्मसभेतही असंच उत्तर मिळेल. तसं जर झालं, तर आपण पुढे काय करायचं?'' ज्ञानेशानं विचारलेला प्रश्न निरुत्तर करणाराच होता. काही क्षण तिथं स्तब्धता पसरली. तिला छेद देत सोपान हळूच म्हणाला.

''दादा, या सगळ्या धर्मग्रंथांच्या पलीकडे जाऊन सगळ्या शास्त्रार्थाला मागे टाकेल आणि धर्मशास्त्र कर्मकांड हे सगळं विसरलं जाऊन समाज आपल्याला आपलंसं करेल, असं काहीतरी करावं लागेल. आपल्याला हटयोग येतो, योगाभ्यासही येतो. त्याचं सामर्थ्य वापरून आपलं समाजोपयोगी अस्तित्व सिद्ध केलं तर?'' सोपान बोलत होता. त्याच्या डोळ्यांत एक वेगळी चमक होती. स्वर लहान होता, पण उत्साहित होता. उच्चारात हळुवारपणा होता, पण विचार ठाम होता. विचाराला एक सुस्पष्ट दिशा होती; पण सोपानाचं बोलणं ऐकून ज्ञानादादाच्या कपाळावर एक बारीकशी आठी उमटली. ''म्हणजे? तुला काय सुचवायचं आहे सोपाना? माझ्या थोडं थोडं लक्षात यायला लागलंय, तरीही तू सांग!'' ज्ञानादादाकडून असं अभय मिळताच सोपानाला उत्साह आला.

''हे बघ ज्ञानादादा, सूर्य रोज पूर्वेला उगवतो; पण तो एखादे दिवशी पश्चिमेला उगवला तर? लोक अचंबित होतील आणि पश्चिमेला उगवलेला सूर्य, हा लोकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरेल. म्हणजे रोज घडणाऱ्या घटनांचा लोकांवर काही परिणाम होत नाही; पण काहीतरी वेगळं, काहीतरी अघटित घडलं, की लोक तिकडे आकर्षिले जातात. लोकांचं, समाजाचं प्रबोधन, उद्बोधन करणं, हे आपलं कर्मकर्तव्य आहे, असं आपण जर ठरवलंय आणि लोकांना ज्ञान देऊन त्यांचं अज्ञान दूर करायचं, हे आपलं जीवितकार्य आपण ठरवलंय, तर मग ते पूर्णत्वाला नेण्यासाठी लोकांनी आपलं ऐकलं पाहिजे आणि ते आपलं ऐकतील, आपल्याकडे आकर्षित होतील, असं काहीतरी आपण केलं पाहिजे.'' सोपाना बोलत होता. त्याच्या उच्चारात सुस्पष्टता होती, मांडणीत ठामपणा होता, शब्दांत सुसंगती होती, विचारात तर्कशुद्धता होती. त्याला काय म्हणायचं आहे, ते ज्ञानेशाला उमजलं असावं; पण ते त्याला अजूनही पटलं नव्हतं ! ''सोपाना, अघटित घडवायचं, त्यावर लोकांना विश्वास ठेवायला लावायचा, म्हणजे लोकांचं अज्ञान दूर करण्याऐवजी त्यांना अंधश्रद्ध बनवायचं, असं तर तुला सुचवायचं नाही ना?'' ज्ञानादादाचा स्वर किंचित कठोर होता. ''नाही दादा! मुळीच नाही; पण... पण हा सूर्य रोज उगवतो, हे लोकांना माहिती आहे. नव्हे ते त्यांनी गृहीत धरलं आहे; पण तो उगवतो म्हणजे काय होतं, हे फक्त सूर्यमालिकेचा अभ्यास करणाऱ्यालाच माहीत आहे. ते आपण लोकांना समजावून सांगितलं, तर रोज घडणाऱ्या सहज घटनेला एक अघटित अर्थ प्राप्त होईल. पाऊस पडतो, ही सहज घटना आहे, असं लोकांना वाटतं; पण सृष्टिचक्र त्यांना समजावून सांगितलं, तर ते त्यांना अघटित वाटेल. रोजच्या सामान्य घटनेमागचं तार्किक कारण लोकांना अघटित वाटेल. म्हणजे दादा आपण त्यांना अंधश्रद्ध न बनवता डोळस बनवत आहोत. फक्त त्यांना माहीत नसलेलं माहीत करून देऊन ! तसंच आत्मिक ऊर्जा, आध्यात्मिक ऊर्जा, पारमार्थिक ऊर्जा जी मानवी देहात वास करते तिचं सामर्थ्य किती आहे, ते आपण लोकांना माहीत करून देऊ. या सगळ्या ऊर्जेचा स्रोत मानवी देहात आहे, हे त्यांना दाखवू. अर्थात, हे दाखवताना त्या ऊर्जेच्या सामर्थ्यानं काहीतरी अघटित घडेलच. समाज त्याला कदाचित चमत्कार म्हणेल; पण समाजाचं अवधान आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी हे जरुरीचं आहे आणि दादा

समाजाला या अज्ञानातून आणि कर्मकांडातून बाहेर काढायचं असेल, तर त्यांचं अवधान आपल्याकडे आकर्षित होणं जरुरीचं आहे. तरच या कर्मकांडापलीकडे जाणारा, धर्मशास्त्रापलीकडे पाहणारा, मानव्य जपणारा एक नवा समाज निर्माण होईल. नवा समाज! आणि... आणि मग पुन्हा कोण्या विठ्ठलपंत-रुक्मिणीला देहान्त प्रायश्चित्त घ्यावं लागणार नाही. पुन्हा... पुन्हा कुणाची लेकरं अनाथ होणार नाहीत. पुन्हा कुणी निवृत्ती-ज्ञानेश्वर-सोपान-मुक्ताला बहिष्कृत करणार नाही आणि... आणि हे जर असं घडायला हवं असेल, तर ऊर्जेचं सामर्थ्य समाजाला दाखवणं, योगसामर्थ्य समाजाला समजावून देणं, हे नितांत गरजेचं आहे.'' बोलता-बोलता सोपानाचा आवाज गहिवरला. ऊर भरून आला. गळ्यात हुंदका दाटला. कुठल्याही क्षणी तो घळाघळा रडायला लागेल, असा त्याचा चेहरा झाला. सोपानाचा प्रत्येक शब्द ज्ञानेशाच्या मनात घर करत होता. त्याच्या प्रत्येक शब्दागणिक ज्ञानेशाचा चेहरा उजळत होता. जणू गर्द अंधाऱ्या रात्रीला छेदून एखादी प्रकाशरेषा जावी. तोच स्वतःला सावरून सोपाना पुन्हा म्हणाला, ''आणि... आणि असं जर घडलं ना दादा, तर ना शुद्धिपत्राची मिरास राहील आणि ना काशीच्या धर्मसभेत जावं लागेल!'' सोपानानं बोलणं संपवलं. पालथ्या हातानं ओघळणारे अश्रू पुसले आणि निवृत्तीदादाकडे पाहिलं. त्याची आणि निवृत्तीदादाची क्षणभर नजरानजर झाली आणि दुसऱ्या क्षणी सोपान निवृत्तीदादाच्या मिठीत कोसळला. त्याच्या पाठीवर प्रेमानं थोपटत, मध्येच त्याच्या कुरळ्या केसातून हात फिरवत निवृत्तीदादा पुटपुटत होता. ''ज्ञाना, ज्ञानेशा, आपला सोपान आता मोठा झाला रे! आपला सोपान आता मोठा झाला बघ!'' निवृत्तीदादाच्या हातावर आपला हात ठेवून सोपानाला कौतुकानं न्याहाळणारा ज्ञानादादा मान हलवत म्हणत होता, ''खरंच! दादा आपला सोपान मोठा झाला बघ!'' आणि विचारानं मोठा झालेला सोपान मात्र निवृत्तीदादाच्या कुशीत एखाद्या लहान बाळासारखा स्फुंदत होता. हुंदके देत होता. अंथरुणावर निजलेल्या आणि या तिघांच्या बोलण्याच्या आवाजानं मघाच जागी झालेल्या मुक्ताला मात्र आपल्या डोळ्यांतून ओघळणारं पाणी पुसण्याचंही भान नव्हतं !

(क्रमश:)

**- सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**सायेब ना मला खुशीनं अन्नपूर्णा म्हणत्यात...**
**तुमाला काय म्हणत्यात हो?...**



# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमशः वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे.

**– व्यवस्थापक**

## अध्याय ८ : अक्षरब्रह्मयोग

**ते अव्यक्त अक्षर ऐसे बोलती । तेच ते जाणपा माझी परमगति । तया पावलिया पुढती । जन्म नाहीं ।।**

त्यास अक्षर हे नाम ती चि शेवटची गति
माझे परम ते धाम जेथूनि परते चि ना ।।२१।।

**तो परम पुरुष जाणावा गा पार्था । तया परम भक्ति पाविजे तत्त्वता । सर्व भूतां प्रपंच ठायी निरुता । तो विश्वव्यापक असे ।।**

लाभे अनन्य-भक्तीने पार्था पुरुष थोर तो ।
ज्यांत ही राहती भूते ज्याने विस्तारले जग ।।२२।।

**जे काळी योगी मरण पावोनी जन्मा येती । जे काळी योगी मरण जालिया पुनरावृत्ति न जोती। तो काळ अर्जुना सांगेन तुजप्रति । ऐक आतां ।।**

कोण्या काळी कसा देह ठेवुनी येथ साधक ।
संसारी पडतो किंवा पावतो सिद्धि ऐक ते।।२३।।

**दिवस आणि शुक्ल पक्षाचे दैवत अग्नी । षड्मास उत्तरायण जाणोनी । तेथे जाती देह त्यजुनी । ते ऐक्य होती ब्रह्मीं जाण ।।**

अग्नीने दिन शुक्लार्ध उत्तरायण जोडुनी ।
जाय तो गाठतो ब्रह्म शेवटी ब्रह्म जाणुनी ।।२४।।

**कृष्णपक्षी रात्रीचे दैवत धुम्र । षडमास दक्षिणायण श्रम । तेथे योगाविण त्यजिती प्राण । ते पावती पुनरावृत्ति ।।**

धूमाने रात्र कृष्णार्ध दक्षिणायन जोडुनी ।
जाय तो परत येथ चंद्र-लोकास पावुनी ।।२५।।

**शुक्ल कृष्ण या दोन्ही गती । ज्ञान अज्ञान यासी म्हणती । एके गतीपासुनी होय मुक्ती । एकी करुनी पुनर्जन्म ।।**

उजेड आणि अंधार दोन्ही मार्ग अनादि हे । ।
सुटका करितो एक, एक फेऱ्यांत टाकितो ।।२६।।

**या दोन्ही आहे ती श्रुती । यासी जे योगी जाणती । ते मोहात न पावती । अर्जुना यालागी योगयुक्त होय।।**

असे हे मार्ग जाणूनि योगी मोह न पावतो ।
म्हणूनि सर्वदा राहे योगाने जोडिला चि तू ।।२७।।

**वेद यज्ञ आणि दान । त्याचे जे बोलिले आहे पुण्य । जया असे शुक्ल कृष्ण गतीचे ज्ञान । ते पुण्यवान परमगतीते पावे ।।**


यज्ञांत दानांत तपांत तैसें । जे बोलिले अध्ययनांत पुण्य । ते लंघिता सर्व चि जाणुनी हें । योगी चढे आद्य पदास थोर ।।२८।।

इति श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्म योगो नाम अष्टमोऽध्यायः ।।८।।


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

**(लेखांक एक)**

**श्री. ओंकार गाडगीळ यांनी सायकलवरून केलेल्या या चारधाम यात्रेचा वृत्तांत नवस्नेहमधून आम्ही क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. माहे फेब्रुवारी मधील अंकात यातील दुसरा लेख अनवधानाने प्रसिद्ध केला गेला असून या अंकात त्या लेखमालेचा पहिला लेख प्रसिद्ध करीत आहोत. आम्ही या चुकीबद्दल दिलगीर आहोत ! वाचकांनी आणि गाडगीळ यांनी देखील आमच्या या चुकीला माफ करावे, ही विनंती.**

तीन महिन्यापूर्वी चारधाम यात्रेला जायचे ठरवले तो एक सप्टेंबरचा दिवस अखेर उजाडला. मनात भीती, काळजी व उत्साह होता. माझा निर्धार बघून घरच्यांनी नाईलाजाने परवानगी दिली पण त्यांच्या मनाची होणारी घालमेल मलाही जाणवत होती. सकाळी साडे चार वाजता माझे काही मित्र नातेवाईक व शेजारी मला शुभेच्छा देण्यासाठी आले होते त्यांचा निरोप घेऊन मी मार्गस्थ झालो. हेरले गावाजवळ पोहोचल्यावर एक भिकारी भेटला. त्याने विचारले कुठे निघालात? मी पण चारधामला चाललो असल्याचे सांगितले तर त्याने मोठ्याने ओरडून तुझी यात्रा यशस्वी होईल असा आशीर्वाद दिला. मन आश्वस्थ झाले. सकाळी साडेआठ वाजता सांगली येथे माझे मित्र श्री. स्वरूप वाटवे यांच्याकडे गेलो. त्यांनी नाष्टा दिला व त्यांनी तयार केलेले मेडिकल कीट घेऊन मी पुढे निघालो. मिरज, नागज मार्गे संध्याकाळी सांगोला जवळ पोहोचलो. सांगोल्या जवळ येता येता पाऊस लागला व सायकल पंक्चर झाली पहिल्याच दिवशी सायकल पंक्चर झाली हे बघून मनात शंका आली पण तरीही सकारात्मक दृष्टिकोन ठेवून लोकल माणसांच्या मदतीने मीच पंकचर काढले व रात्री विद्याधर गोखले यांच्या मित्राच्या मदतीने सांगोला सूतगिरणीच्या अतिथी गृहात मुक्काम केला. सकाळी पंढरपूर येथील श्रीराम खानावळ येथे भरपेट नाश्ता मिळाला. या संपूर्ण यात्रेमध्ये जेवण व राहणे यासाठी भिक्षा मागून प्रवास करायचे ठरवले होते. भिक्षा मागवयाचे कारण म्हणजे आपल्यातला मीपणा नाहीसा होणे व लोकांबरोबर संवाद होऊन अखंड भारताबद्दल जन आणि मन जागृत व्हावी हा हेतू होता. पंढरपुरात माऊलींचे दर्शन घेऊन शेटफळ मार्गे बार्शीबीडकडे निघालो. दुपारी एका फळ विक्रेत्या मावशींकडून केळी व पेरू घेऊन दुपारचे जेवण आटोपले व रात्री शेंद्रे येथील हनुमान मंदिरात मुक्कामाला आलो. गावातील लोकांनी रात्रीचे जेवण मंदिरातच दिले. संध्याकाळी वाटेत एका व्यक्तीने मला थांबवले व मला शंभर रुपये दक्षिणा देऊन नमस्कार केला. मी थोडा अवघडलो पण परिक्रमेत ह्या गोष्टीची मला सवय झाली होती त्यामुळे मी पण वाकून नमस्कार केला व पुढे निघालो. आज तिसरा दिवस उजाडला. हळूहळू पाय सराऊ लागले होते आज भूम मार्गे बीडला जायचे होते. मध्येच मांजरसुबा घाट लागतो. पण घाट उतरायचा असल्यामुळे काळजी नव्हती, पण बीड हायवे येईपर्यंत रस्ता खराब असल्यामुळे थकायला झाले. मांजरसुबा घाटाच्या पायथ्याशी पाली नावाच्या गावात छान बंधारा आहे तेथे बरेच पक्षी येतात व त्यांना बघण्यासाठी पर्यटक पण येतात. संध्याकाळ होता होता बीड गावाच्या पुढे पेंडगाव मध्ये प्रसिद्ध हनुमान मंदिर आहे तिथे पोहोचलो व मुक्काम केला. रात्री माझे मित्र श्री. नवनाथ मिसाळ मला भेटायला तिथे आले होते व त्यांनी मला भोजन दिले. आज एकादशी असल्यामुळे मंदिरात बराच

वेळ भजन चालू होते. मी पण त्यात सहभागी झालो. आज गेवराई मार्गे जालन्याला जायचे होते. सकाळी अकरा वाजता अंबड तालुक्यातील एका शाळेजवळून जाता जाता शाळेच्या मैदानात प्रार्थना चालू होती. मी पण रोडवर थांबून शाळेची जुनी पण सुंदर इमारत बघत होतो. तेवढ्यात गुरुजींनी मला बोलावले व मुलांशी संवाद करायला सांगितले. मी मुलांना अखंड भारताबद्दल विचारले असता भारत खंडित झाला आहे याबद्दल त्यांना कल्पना नव्हती. ते अत्ताचाच भारत संपूर्ण भारत आहे असे समजतात. मी मुलांना भारत केव्हा खंडित झाला व तो पुन्हा अखंडित होणे किती गरजेचे आहे, सिंधू नदी भारतामध्ये असणे का महत्त्वाचे आहे याबद्दल माहिती दिली, तिथेच गुरुजींनी आपला डब्यातील जेवण मला दिले व मग मी पुढे निघालो. संध्याकाळी राजूर येथे आलो. तिथे पेशवेकालीन गणपती मंदिर आहे. आत्ताच त्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. कोल्हापूर मधील माझे मित्र मला भेटायला तिथे आले होते. सायकल तिथेच ठेवून मी मित्रांबरोबर त्यांच्या गाडीतून शेगाव संस्थान येथे वस्तीला गेलो.

**– ओंकार गाडगीळ**

मोबा. ९८२२८७६९२२


**श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोल्हापूर**

**ठेवींचे आकर्षक व्याजदर (दि. २२ जानेवारी २०२६ पासून)**

| मुदत | दर |
|---|---|
| ४६ ते ९० दिवस | ६% |
| ९१ ते १८० दिवस | ७% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८% |
| १३ महिने | ९% |
| २५ महिने | १०% |
| (ठेव योजना ३१/०३/२०२६ पर्यंत आहे) | |

**रिकरिंग ठेव व्याजदर**

| रिकरिंग ठेव बेमुदत | व्याजदर | मिळणारी रक्कम (१०० च्या पटीत) |
|---|---|---|
| १ वर्ष | ७% | १२४६/– |
| १ वर्ष महालक्ष्मी ठेव महिलांसाठी | ८% | १२५२/– |
| २ वर्षे | ८% | २६०९/– |
| ३ वर्षे | ९% | ४१४१/– |

| | | |
|---|---|---|
| कर्जाचे व्याजदर : | वैयक्तिक किंवा विनातारण कर्ज | १५% |
| | तारण कर्ज | १३% |

ठेव तारण कर्ज – ठेव व्याजदरापेक्षा २% जादा आकारणी.

# वेळेचे गणित

# मनाला खुपणारं कागदावर

## (लेखांक ६)

आळस आणि त्यामुळे निर्माण होणारा वेळकाढूपणा हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. नुसतेच गणितात नाही, तर आयुष्यातही काळ, काम, वेगाचे गणित जमवावेच लागते. ज्याला हे गणित जमतं तो स्वस्थ मनाने प्रत्येक काम करू शकतो. शुभस्य शीघ्रम् या शब्दामध्ये कोणतेही काम लगेच करा, तातडीने करा म्हणजे ते शुभकारीच ठरेल असा अर्थ दडला आहे असं मला वाटतं. आजच्या गतीमान, धावपळीच्या, धक्काधक्कीच्या, पळा पळा कोण पुढे पळते या जीवनशैलीत तर काम आणि वेळ याचे नाते निश्चितच अधिक दृढ केले पाहिजे असे म्हणावेसे वाटते. आजही मुहूर्त ही कल्पना मानली जाते. लग्न, मुंज, वास्तुशांत इ. कामासाठी दिवस आणि नेमकी वेळ ठरवणे म्हणजे मुहूर्त ! या विशिष्ट वेळी अक्षता पडण्यासाठी, पूजा करण्यासाठी आपण आटापिटा करतो. कामाची ठरलेली वेळ पाळणे हाच या संकल्पनेमागे हेतू असतो. दैनंदिन आयुष्यांत Time Management – वेळेचं नियोजन याचे धडे गिरवले पाहिजेत.

पैशापेक्षाही वेळ महत्त्वाची आहे. गेलेला पैसा आपण पुन्हा मिळवू शकतो पण गेलेली वेळ, गेलेला क्षण पुन्हा कधीही परत मिळत नाही. लग्न किंवा विवाह समारंभाला 'इव्हेंट'चं रूप आल्यापासून विवाह मुहूर्त खूप पुढे गेल्याच्या घटना आढळतात. माझ्या चांगल्या परिचित एका कुटुंबाच्या मुलाच्या विवाह समारंभाला मी गेले होते. नवरा मुलगा बँकेत नोकरीला होता. सकाळी साडेनऊचा विवाह मुहूर्त होता. लग्नानंतर वधूवरांना भेटून जेवण करून अकरा वाजेपर्यंत बँकेत जाता येईल अशा विचाराने विवाहासाठी आलेल्या नवरदेवाच्या सहकाऱ्यांनी रजा घेतली नव्हती. फोटो सेशन लांबल्याने आणि त्यानंतर सुरू झालेला वधूचा साजशृंगार वेळत न आवरल्याने साडेदहा वाजत आले तरी मंचावर वधूवर न आल्याने नाईलाजाने सर्वजण बँकेत गेले. लग्नाचे न घेतलेलं जेवण नवरदेवाने आपल्या सहकाऱ्यांना दिले, पण 'बूँदसे गयी वो हौदसे नही आती' अशी अवस्था वेळेचं गणित बिघडल्याने झाली.

बारसं, डोहाळेजेवण, वाढदिवस इ. कौटुंबिक समारंभ जेव्हा एखाद्या कार्यालयात किंवा तत्सम ठिकाणी केला जातो, त्यावेळी हे समारंभ बहुतेक वेळेला वेळेवर सुरू होऊन वेळेवर संपतात. कारण ही जागा काही तासांसाठी आवश्यक रक्कम भरून घेतलेली असते. पण ज्यावेळी हे समारंभ घरातच साजरे होतात, त्यावेळी वेळ कसोशीनं पाळली जात नाही.

काही लोकांचं वेळेकडे लक्षच नसतं आणि जेव्हा वेळेचं भान येतं तेव्हा धावपळ, पळापळ करावी लागते. याउलट अनेकजण वेळ पाळण्या–बाबत बरेचसे बेफिकीर असतात. काय करायचं वेळेत जाऊन, कोणी वेळत येत नाही, मग आपण तरी कशाला जायचं? असा विचार करत बहुसंख्य लोक कार्यक्रम, समारंभांना वेळेवर जात नाहीत. कार्यक्रमाच्या वेळेआधी पोचलो तर ताटकळत, वाट पहात थांबावं लागेल, पण क्वचित प्रसंगी थोडासा झालेला उशीरही त्रासदायक, क्लेशकारक ठरू शकतो. काही वर्षांपूर्वी आमच्या घरासमोरील घरात आजी–आजोबा, त्यांचा मुलगा–सून आणि नातू रहात होते. त्या आजी–कुसूमताई शेजारची शैला आणि मी जवळजवळ रोज संध्याकाळी साडेपाच वाजता भाजी आणायच्या हेतूने बाहेर जात होतो. पंचेचाळीस ते पन्नास मिनिटात आम्ही परत येत असू. कुसुमताई कधीही साडेपाचला तयार नसायच्या. मग आम्ही त्यांना हाका मारायच्या. तीन–चार मिनिटांनी त्या बाहेर येत. एकदा आम्ही त्यांना म्हटलं, तुम्ही

तयार होऊन फाटकाशी येत जा ना. त्या हो म्हणाल्या. पण पुन्हा पहिले पाढे पंचावन्न. चार-पाच वर्षांनी त्या त्यांच्या गावाकडे गेल्या. काही दिवसांपूर्वी त्यांचा अचानक फोन आला, 'माझे मोठे दिर वारले. त्यावेळी मला बरं नव्हतं म्हणून मी येऊ शकले नाही. पण त्यांच्या दहाव्याला मी येणार आहे. दहा पर्यंत तिथे जायचं आहे. मी तुमच्याकडे नऊ वाजेपर्यंत येईन.' ठरल्याप्रमाणे त्या आमच्याकडे आल्या. मी चहा-खाणं अगदी तयार ठेवलं होतं. खाणं संपलं तेव्हा नऊ चाळीस झाले होते. मी त्यांना म्हटलं, 'तुम्ही आता निघा. कारण तुमच्या कारनं तिथं पोचायला २० मिनिटे लागतील.' यावर कुसुमताई म्हणाल्या, 'अहो म्हटलं म्हणजे दहा वाजता विधी थोडेचे सुरू होतात का? आम्ही दहाला पाच मिनिटं असताना निघू.' मी शांत राहिले. मला नंतर काही दिवसांनी कळलं - कुसुमताई तिथे पोचल्या तेव्हा सर्व विधी संपवून नातलग मंडळी आपल्या परतीसाठी वहानात बसू लागली होती. कुसुमताई आणि त्यांचा मुलगा गाडीतूनही उतरले नाहीत. ज्यासाठी आले होते, ते साध्य झालं नाही. गेल्या माणसाचे हे विधी एकदाच होतात ना? मुद्दाम त्यासाठी येऊनही तसंच परत जाणं हे निश्चितच क्लेषदायी असतं. मनाला ही बोच, हे शल्य कायमचं सलत राहणार. पण हे असं का झालं - वेळेचं गणित चुकलं.

शाळा, महाविद्यालय, बँका, एलआयसी इ. ठिकाणांचे कार्यक्रम वेळेत सुरू होतात. कारण त्यांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळेतच कार्यक्रमाच्या वेळेचं गणित बसवावं लागतं. परंतु सार्वजनिक कार्यक्रम, महिला मेळावे, राजकीय पक्षाच्या नेत्यांचे कार्यक्रम जवळजवळ कधीच वेळेवर सुरू होत नाहीत. दहा-पंधरा मिनिटे किंवा अर्ध्या तासाचा उशीरही समजू शकतो, पण अनेक वेळेला दीड-दोन तास उशीराने कार्यक्रमाचा आरंभ होतो. मला का कोण जाणे राहून राहून असं वाटतं की वेळेवर येणाऱ्या प्रत्येकाला उशीरा येणारे लोक आपल्या कृतीने हिणवत असतात किंवा अपमानित करत असतात. या विधानासाठी वेळ न पाळणाऱ्या लोकांची मी क्षमा मागते. 'जित्याची खोड मोडल्याशिवाय जात नाही' या उक्तीप्रमाणे सगळे उशीरा येतात, मग आपणच कशाला वेळेवर जायचे? या विचारानं कार्यक्रमाला उशीरा जायचं असे मी ठरवते, पण कार्यक्रमाची नियोजित वेळ जवळ येऊ लागते तशी मनाला येणाऱ्या अस्वस्थपणामुळे मी वेळेतच जाते.

एकदा एका महिला मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मला निमंत्रित केले होते. सुमारे एक तासाचा प्रवास करून पावणेदहाच्या सुमारास मी कार्यक्रमस्थळी पोचले. साडेदहा वाजले तरी सर्व आघाड्यावर सामसूम. न राहवून कार्यक्रम कधी सुरू होणार असं विचारल्यावर मला उत्तर मिळालं-अहो बायकांचा कार्यक्रम. तास-दिड तास उशीर होणारच की ! मी गप्प राहिले. पण त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन आणि स्वरूप पाहून कार्यक्रम मला दिलेल्या वेळेपेक्षा किती उशीराने सुरू होईल असे स्पष्टच विचारू लागले. माझ्या वडिलांमुळे लहानपणापासून लागलेली वेळ पाळण्याची सवय, पुढे महाविद्यालयांतील शास्त्र शाखेकडे नोकरी आणि तेरा वर्षे एन.सी.सी. ऑफिसर म्हणून कार्यरत असल्याने वेळेबाबत मी नको इतकी काटेकोर झाले. एन.सी.सी. अधिकारी होण्यासाठी ग्वाल्हेर येथे तीन महिन्यांचे प्रशिक्षण घ्यावे लागले. प्रशिक्षणाच्या संपूर्ण कालावधीत प्रत्येक गोष्टीसाठी वेळ आणि शिस्त यांचे कठोर पालन करावे लागले.

दैनंदिन नागरी आयुष्य जगताना सभा, समारंभ, कार्यक्रम, मेळावे इ. पार पाडताना लष्करी शिस्त आणि वेळ पाळणे कठिण आहे हे निश्चित. पण प्रत्येकाने वेळेचं गणित कसोशीनं पाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे असं म्हणावंसं वाटतं आणि ठरवलं तर ही गोष्ट सहज शक्य आहे. सर्व स्तरातील महिलांसाठी काम करणारी एक स्वयंसेवी संस्था कोल्हापुरात आहे. वर्षभर लहान मोठे कार्यक्रम,

स्पर्धा, शिबीरं, प्रदर्शन भरवणं, महिला मेळावे इ. चं आयोजन या संस्थेमार्फत केलं जातं. दोन तपाहून अधिक काळ या संस्थेचं कामकाज मी जवळून पाहात आहे. काही उपक्रमात माझा सहभागही असतो. ही संस्था स्थापन करण्यात ज्यांचा सिंहाचा वाटा होता त्या प्रमुख आज हयात नाहीत, पण त्यांनी घालून दिलेल्या शिस्तीचे पालन करत आजही ही संस्था तेवढ्याच जोमाने काम करत आहे. प्रत्येक लहान मोठा कार्यक्रम अगदी उत्तम प्रकारे आणि वेळेवर सुरू होऊन वेळेवरच संपतो.

वेळेचं गणित नेहमीच अचूकपणे मांडणाऱ्या नामवंत व्यक्ती आणि संस्था आपल्यापैकी अनेकजणांना तर माहित असतील. पण प्रत्येकजण याबाबत जागरूक असला पाहिजे. कोणत्याही देशाची प्रगती उत्तमप्रकारे होणं हे त्या देशातील सर्वसामान्य नागरिक प्रत्येक गोष्टीबाबत किती जागरूक आहे यावर अवलंबून असते. आपण कुठेही जाताना, एखाद्या कार्यक्रमाला जाताना, कार्यक्रम संपवून आपण घरी किती वाजेपर्यंत परत येऊ याचे गणित मनात मांडत असतो. त्यानुसार कामाचं नियोजनही करतो. जे सारं बिघडतं असे अनेक अनुभव गाठीशी असताना काल आणि एकाची भर पडली. सायंकाळी चार ते सात या वेळेत होणाऱ्या कार्यक्रमाला तिकीट काढून गेले होते. कार्यक्रम सुरू झाला साडेपाचच्या सुमारास त्यामुळे कार्यक्रम संपल्यावर रिक्षाने घरी येण्यास नऊ वाजून गेले.

माणसाचं वेळेचं गणित चुकलं तरी मृत्युची वेळ नियती चुकवू देत नाही याची प्रचिती देणारा ४० वर्षांपूर्वी घडलेला हा प्रसंग. आमच्या कुटुंबाचे दोन जवळचे मित्र घरातून बाहेर पडायला उशीर झाल्याने त्यांच्या डोळ्यादेखत निपाणी स्थानकातून बेळगाव-मुंबई गाडी बाहेर गेली. काही झालं तरी कोल्हापुरात २०-२५ मिनिटं थांबणारी हिच बस गाठायची म्हणून स्थानकाशेजारी राहणाऱ्या मित्राच्या दुचाकीवर तिघांनी स्वार होऊन कोल्हापूर स्थानक गाठलं. ठरवलेली बसच प्रवासाला मिळाल्याचा आनंद होता. खंबाटकी घाटात या बसला भीषण अपघात होऊन बसमधील सर्व प्रवासी दगावले. माणसानं वेळेचं गणित अचूक पाळलं किंवा वरील प्रसंगाप्रमाणे वेळेचं चुकलेलं गणित बरोबर करण्याचा प्रयत्न केला तरी नियतीनं ठरवलेल्या वेळेपुढे माणूस हतबलच असतो हा सदैव मनाला खुपणारा विचार तुमची क्षमा मागून लेखाच्या शेवटी मांडला आहे !

**- कमल हर्डीकर,**
मोबा. ९६८९३६९९२६, ९४२०४५८४२५

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**
**गोखले ब्रदर्स**
**सराफी दुकान**
**रविवार, दि. 1 पुष्य नक्षत्र**
**आपलं दुकान**
**महाद्वार रोडवर, 0231-2546585**



# भारतरत्न
# विनायक नरहर भावे

विनायक नरहर भावे  विनोबा भावे नावाने लोकप्रिय होते.ते भारतीय स्वातंत्र्यसैनिक व भूदान चळवळीचे प्रणेते होते. महात्मा गांधींनी १९४० मध्ये ‘वैयक्तिक सत्याग्रह’ पुकारला, त्यावेळी पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी भावेंची निवड केली. ब्रिटिश राजविरोधी या आंदोलनाचे पर्यवसान १९४२ मध्ये ’छोडो भारत’ आंदोलनात झाले. भावे पुढे सर्वोदयी नेते म्हणून प्रसिद्ध झाले.

कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तहसिलातील गागोदे या गावी ११ सप्टेंबर १८९५ रोजी विनोबा तथा विनायक नरहर भावे यांचा जन्म झाला. आजोबांचे नाव शंभुराव भावे. शंभुराव भावे यांचे जन्मगाव वाई. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. वाईच्या ब्राम्हणशाही या मोहल्ल्यात कोटेश्वर मंदिर आहे. हे भावे यांच्या मालकीचे असून तेथे शंभुरावांनी अग्निहोत्र स्वीकारून अग्निहोत्र शाळा स्थापली होती. आजोबा आणि मातुश्रींपासून धर्मपरायणतेचे संस्कार विनोबांना मिळाले. त्यांचे वडील नरहरी शंभुराव भावे व आई रखुमाबाई. वडील नोकरीच्या निमित्ताने बडोदे येथे गेले. विनोबांचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईस जाण्यास निघाले; परंतु वाटेतच सुरतेस उतरून आईवडिलांना न कळविताच वाराणसी येथे रवाना झाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते. एक हिमालय व दुसरे बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक, वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयातील एका समारंभात महात्मा गांधीचे भाषण झाले. त्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती यांच्या दोन्ही प्रेरणा महात्मा गांधीच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्त्वात त्यांना आढळल्या. त्यांनी महात्मा गांधींशी पत्रव्यवहार केला व गांधींची कोचरब आश्रमात ७ जून १९१६ रोजी भेट घेतली आणि तेथेच त्या सत्याग्रहश्रमात नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवनसाधना सुरू केली. ऑक्टोबर १९१६ रोजी महात्मा गांधींकडून एक वर्षाची रजा घेऊन ते वाई येथे प्राज्ञपाठशाळेत वेदान्ताच्या अध्ययनाकरिता उपस्थित झाले. ब्रह्मविद्येची साधना त्यांचा जीवनोद्देश होता. भावे हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये महात्मा गांधींसोबत होते. स्वातंत्र्य लढ्यातील सहभागाबद्दल सन १९३२ मध्ये त्यांना तुरुंगवास घडला.

वाई येथील प्राज्ञपाठशाळा मंडळाचे संस्थापक व मुख्याध्यापक स्वामी केवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे) यांच्यापाशी विनोबांनी उपनिषदे, ब्रह्मसूत्र, शांकरभाष्य, पातंजलयोगसूत्रे इ. विषयांचे अध्ययन केले. माहुली येथील स्वामी कृष्णानंद यांच्या आश्रमातील काही प्रौढ विद्यार्थी–शिवनामे, वि.का. सहस्रबुद्धे इत्यादी मंडळीही त्यांच्याबरोबर सहाध्यायी होती.

दिनकरशास्त्री कानडे व महादेवशास्त्री दिवेकर हे प्राज्ञपाठशाळेची व्यवस्थापनाची व अन्य प्रकारची कामे पाहत होते. प्रत्येक सोमवार हा या पाठशाळेचा सुटीचा म्हणजे अनध्ययनाचा दिवस असे. त्या दिवशी पाठशाळेची अंगमेहनतीची कामे शिक्षक-विद्यार्थी उरकत असत आणि प्रज्ञानंदस्वामींच्या समाधि-स्थानाच्या सभागृहात विद्यार्थी व शिक्षक यांच्या शास्त्रार्थ चर्चेकरता साप्ताहिक सभा भरत. चर्चेचे विषय सामाजिक, धार्मिक, तात्त्विक हे असतच; परंतु त्याबरोबर प्रचलित राजकारणाची अनेक बाजूंनी मीमांसाही चालत असे. दिनकरशास्त्री कानडे हे सेनापती बापट, स्वातंत्र्यवीर सावरकर, योगी अरविंद घोष इत्यादी सशस्त्र क्रांतीकारकांच्या मार्गाने चालणाऱ्या एका गुप्त कटाचे सदस्य होते. सशस्त्र क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा ते पुरस्कार करीत. विनोबांच्याप्रमाणेच त्यांचेही वक्तृत्व अमोघ होते. अहिंसक क्रांतीची वैचारिक भूमिका विनोबा मोठ्या परिणामकारक रीतीने या साप्ताहिक सभांमध्ये मांडीत असत. १९१७ साली हिवाळ्यात वाई येथे प्लेगची साथ उद्भवली. कृष्णेच्या दक्षिण तीरावर राहुट्या आणि पर्णशाला उभारून त्यांत प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी व शिक्षक जवळजवळ ४ महिने राहिले. वेदान्ताचे व इतर शास्त्रांचे पाठ त्यांतील एका विस्तृत पर्णशालेमध्ये चालत असत. विनोबा पर्णशालेबाहेरच्या कृष्णाकाठच्या आम्रवृक्षाच्या छायेखाली उपनिषदांचे व शांकरभाष्याचे उच्च स्वरात वाचन करीत, हळूहळू सावकाश फेऱ्या मारीत असत. त्यांचे ते प्रसन्न वाचन ऐकून स्वामी केवलनंदांच्या मनावर विनोबाजींच्या व्यक्तिमत्त्वाची खूप खोल छाप पडली, विनोबांनी वेदान्त विषयामध्ये खूप वेगाने १० महिन्यांत प्रगती केली. आपण कोणकोणत्या ग्रंथांचे व विषयांचे अध्ययन केले याचा सविस्तर वृतान्त त्यांनी महात्मा गांधींना कळवला. गांधीं हे वृत्तान्तपत्र वाचून अत्यंत विस्मित झाले. त्या पत्राच्या उत्तरात म. गांधींनी अखेर म्हणले की, ए गोरख, तूने मच्छिंदरको भी जीत लिया है !

विनोबा वाईहून परत अहमदाबादला फेब्रुवारी १९१८ मध्ये परतले. १९१८ साली एन्फ्ल्यूएंझाची साथ देशभर पसरली. लक्षावधी लोक त्या साथीला बळी पडले. त्यात विनोबांचे वडील, मातुश्री आणि सगळ्यात धाकटा भाऊ दत्तात्रय हे आजारी पडले. ही गोष्ट महात्मा गांधीना कळल्यावर त्यांनी विनोबांना मातुश्रींच्या शुश्रूषेकरता बडोद्यास जाण्याचा आग्रह धरला. विनोबा तयार नव्हते. गांधीनी त्यांचे मन वळवले. आई आणि धाकटा भाऊ या रोगाला बळी पडले. वडील बरे झाले. विनोबा सर्वांत ज्येष्ठ पुत्र, म्हणून आईचा अंत्यविधी त्यांनीच करणे प्राप्त होते. पुरोहिताकडून अंत्यविधीचा संस्कार करवून घेणे विनोबांना मान्य नव्हते. म्हणून ते स्मशानात गेले नाहीत. वडिलांनी पद्धतीप्रमाणे अंत्यविधी उरकून घेतला.

१९२१ साली गांधींचे भक्त शेठ जमनालाल बजाज यांनी साबरमतीच्या सत्याग्रह आश्रमाची शाखा वर्ध्याला काढली. त्या शाखेचे संचालक म्हणून महात्मा गांधीनी विनोबांची रवानगी वर्ध्यास केली. ८ एप्रिल १९२१ रोजी विनोबा वर्ध्याला पोहोचले. आतापर्यंत संबंध आयुष्य -१९५१ ते ७३ पर्यंतची भूदानयात्रा सोडल्यास या वर्ध्याच्या आश्रमातच राहून विनोबांनी तपश्चर्या करीत जीवन घालविले. हा वर्ध्याचा आश्रम क्रमाने मगनवाडी, बजाजवाडी, महिलाश्रम, सेवाग्राम व पवनार ह्या ठिकाणी फिरत राहिला. ही सर्व ठिकाणे वर्ध्याच्या ८ किमी. परिसरातच आहेत. दिवसातले सात-आठ तास सूत कातणे, विणणे आणि शेतकाम यांमध्ये त्यांनी घालविले. रोज नेमाने शरीरश्रम प्रत्येक माणसाने करावे, असा त्यांचा सिद्धान्त होता. 'शरीरश्रमनिष्ठा' हे त्यांच्या जीवन-तत्त्वज्ञानाप्रमाणे महत्त्वाचे व्रत होते. शरीरश्रमांबरोबरच त्यांनी मानसिक, आधात्मिक साधनाही प्रखरतेने केली. १९३० व ३२ च्या सविनय कायदेभंगाच्या

चळवळीत त्यांनी कारागृहवास भोगला. १९४० साली महात्मा गांधीनी स्वराज्याकरिता वैयक्तिक सत्याग्रहाचे आंदोलन आरंभले. त्यात पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली. जवाहरलाल नेहरू हे दुसरे निवडले. आध्यात्मिक साधनेला वाहून घेतलला शत्रुमित्रसमभावी तपस्वी मनुष्य सत्याग्रहाला अत्यंत आवश्यक, म्हणून त्यांनी विनोबांची निवड केली. कारण सत्याग्रह हे शत्रूच्या हृदयपरिवर्तनाचे नैतिक शुद्ध साधन होय, अशी महात्मा गांधींची मूलभूत राजकीय भूमिका होती. उच्चतम आध्यात्मिक जीवनसाधनेस वाहिलेला शत्रुमित्रभाव विसरलेला माणूसच असे हृदय-परिवर्तन करू शकतो, अशी गांधींची धारणा होती. २० ऑक्टोबर १९४० रोजी स्वसंपादित हरिजन साप्ताहिकात गांधींनी आपल्या या शिष्याची ओळख करून दिली आहे.

१९३२ सालच्या सविनय कायदेभंगाच्या सामुदायिक आंदोलनात विनोबांनी भाग घेतला. त्यांनी धुळे कारागृहामध्ये शिक्षा भोगली. सुप्रसिद्ध गीताप्रवचने या कारागृहात त्यांनी दिली. शंभरापेक्षा अधिक सत्याग्रही कैदी आणि इतर गुन्ह्यांसाठी शिक्षा झालेले कैदी या प्रवचनांच्या रविवारच्या सभेत उपस्थित असत. त्यांमध्ये शेठ जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंदा, अण्णासाहेब दास्ताने, साने गुरुजी इ. मंडळी उपस्थित असत. प्रवचनांचा मुख्य दृष्टिकोन 'गीता ही साक्षात भगवंताची उक्ति होय', असा होता. त्या उक्तीला पूर्ण प्रमाण मानूनच, त्यासंबंधी कसलीही साधकबाधक चर्चा न करताच त्यांनी ती १८ प्रवचने दिली. लो. टिळकांच्या गीतारहस्याचा मुख्य दृष्टिकोन त्यांनी मानला नाही. आद्य शंकराचार्यांचाच मुख्य दृष्टिकोन मान्य केला, असे दिसून येते. मोहनिरास म्हणजे अज्ञाननाश हे गीतेचे मुख्य उद्दिष्ट त्यांनी मानले. अर्जुनाला युद्धास प्रवृत्त करणे हा उद्देश गृहीत धरून केलेला कर्मयोगाचाच उपदेश गीतेत आहे, हा टिळकांचा दृष्टिकोन विनोबांनी स्वीकारली नाही. विनोबांनी निष्काम कर्मयोग मान्य केला; परंतु युद्धोपदेशाकडे कानाडोळा केला. महात्मा गांधींच्या मताने गीतेमध्ये युद्धाचा आदेश हा भौतिक सशस्त्र युद्धाचा आदेश नाही. मानवी हृदयात चाललेल्या सद्भावना व असद्भावना यांच्या संघर्षाला काव्यमय बनवण्यासाठी योजलेले मानवी सशस्त्र युद्धाचे कविकल्पित रूपक गीतेने योजिलेले आहे; महाभारत हा इतिहासग्रंथ नाही म्हणून त्यातील योद्धे आणि युद्धात गुंतलेले शत्रुमित्रपक्ष हे केवळ कविकल्पित होत; असे महत्मा गांधी अनासक्ति योग या पुस्तकात प्रतिपादितात. विनोबा आणि गांधी हे दोघेही निरपवाद अहिंसा तत्त्वाचे पुरस्कर्ते. भगवद्गीता वाचत असताना विनोबा भगवद्गीता हा युद्धोपदेश नाही असे सांगतात आणि महत्मा गांधी ते आध्यात्मिक भावनांचे युद्ध होय, असे सांगतात. हा युद्धाचा मुद्दा सोडला, तर सगळ्या एकेश्वरवादी धार्मिकांना प्रेरणा देणारे अत्युच्च जीवनविषयक व विश्वविषयक तत्त्वज्ञान अतिशय सुंदर रीतीने गीतेमध्ये सांगितले असल्यामुळे गीता हा हिंदूंनाच नव्हे तर जगातील अध्यात्मवाद्यांना मोहून टाकणारा ग्रंथ आहे, यात शंका नाही. म्हणूनच, गीता जरी सशस्त्र हिंसात्मक युद्धाचा पुरस्कार करत असली, तरी गांधींना आणि विनोबांना या गीतेने कायम मोहून टाकले आहे. म्हणून गांधींनी आणि विनोबांनी जन्मभर सकाळ-संध्याकाळ चालविलेल्या प्रार्थनासंगीतात भगवद्गीता ही कायमची अंतर्भूत केली होती.

वैयक्तिक सत्याग्रहानंतर ७ मार्च १९५१ पर्यंत पवनार येथील परंधाम आश्रमातच विनोबांनी शारीरिक आणि मानसिक तपश्चर्येत जीवन व्यतीत केले. १९३६ पासून म. गांधी साबरमतीचा आश्रम सोडून सेवाग्रामला म्हणजे पवनारजवळच येऊन राहिले. त्यामुळे गांधी आणि विनोबा यांचा चिरकाल संवाद चालू राहिला. गांधींच्या देहान्तानंतर सर्वसेवासंघ व सर्वोदय समाज या संस्थांची स्थापना

झाली. मार्च १९४८ मध्ये विनोबा दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू यांच्या विनंतीवरून गेले. भारत-पाक फाळणी झाल्यानंतर परागंदा झालेले लक्षावधी शरणार्थी (सर्व बाजूंनी जीवन उद्ध्वस्त झालेले) दिल्ली, पंजाब, राजस्थान यांमध्ये आले. त्यांना धीर देण्याकरता विनोबांना पंडितजींनी बोलावून घेतले. या दौऱ्यात सर्वधर्मसमभावाचा आदेश देऊन प्रेम आणि सद्भावना निर्माण करण्याचा प्रयत्न विनोबांनी केला. विनोबानी आपल्या विचारातून वर्तमानाला बंधन असावे म्हणजे वृत्ति मोकळी राहते.सत्य, संयम, सेवा ही पारमार्थिक जीवनाची त्रिसूत्री आहे. आध्यात्मिक व्यवहार म्हणजे स्वाभाविक व्यवहार म्हणजे शुद्ध व्यवहार.हिंदुधर्माचे स्वरूप: आचार-सहिष्णुता, विचारस्वातंत्र्य, नीति-धर्माविषयी दृढता.प्राप्तांची सेवा, संतांची सेवा, द्वेषकर्त्याची सेवा ही सर्वोत्तम सेवा.असत्यात शक्ति नाही. आपल्या अस्तित्वासाठी ही त्याला सत्याचा आश्रय घेणे भाग आहे.सत्य, संयम, सेवा ही पारमार्थिक जीवनाची त्रिसूत्री आहे.ईश्वर, गुरू, आत्मा, धर्म, आणि संत ही पाच पूजास्थाने.इतिहास म्हणजे अनदिकालापासून आत्तापर्यंतचे सर्व जीवन. पुराण म्हणजे अनदिकालापासून आत्तापर्यंत टिकलेला अनुभवाचा अमर अंश. अशी सत्ये सांगितली.

आचार्य विनोबा भावे यांनी अष्टादशी (सार्थ), ईशावास्यवृत्ति, उपनिषदांचा अभ्यास, गीताई, गीताई-चिंतनिका, गीता प्रवचने ही पुस्तके लिहिली. भूदानयज्ञाचे वातावरण निर्माण करण्यासाठी या पुस्तकांचा उपयोग झाला. १९३२ साली धुळ्याच्या कारागृहात अनेक संत, सत्पुरुष गोळा झाले होते, त्यांच्यासमोर ही प्रवचने झाली. ती साने गुरुजींनी टिपून ठेवली. गुरूबोध सार (सार्थ), जीवनदृष्टी, भागवत धर्म-सार, मधुकर, मनुशासनम् (निवडक मनुस्मृती-मराठी), लोकनीती, विचार पोथी, साम्यसूत्र वृत्ति, साम्यसूत्रे आणि स्थितप्रज्ञ-दर्शन हे ग्रंथ लिहिले.

दिनांक १५ नोव्हेंबर १९८२ रोजी सकाळी ९.४० वाजता पवनार येथे परंधाम आश्रमात सतत सात दिवस प्रायोपवेशन करून भूदाननेते आचार्य विनोबा भावे यांनी वयाच्या ८७ व्या वर्षी प्राणत्याग केला. त्यांच्या निधनाची वार्ता त्यांनी प्रायोपवेशन सुरू केल्यानंतर केव्हाही अपेक्षित होती. ५ नोव्हेंबर रोजी विनोबांना ताप आला, त्याबरोबरच हृदयविकारही उद्भवला आणि प्रकृती चिंताजनक झाली. उपचार त्वरित सुरू झाले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात उपचार करण्याकरता नेण्याचा विचार तज्ज्ञ डॉक्टरांनी विनोबांना सांगितला; परंतु त्यांनी परंधाम आश्रम सोडण्यास नकार दिला व तेथेच उपचार सुरू झाले. मुंबई येथील जसलोक हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉ. मेहता मुंबईहून आले. हळूहळू प्रकृती सुधारेल अशी आशा उत्पन्न झाली. ॲलोपथीचे उपचारही विनोबांनी स्वीकारले, परंतु ८ नोव्हेंबर रोजी रात्री अन्नपाणी आणि औषधे या तिनही गोष्टी घेण्यास त्यांनी नकार दिला. आचार्यांचे बंधू शिवाजीराव भावे, मित्र दादा धर्माधिकारी इत्यादी मंडळींनी व आश्रमस्थ भक्तजनांनी आचार्यांना परोपरीने काकुळतीस येऊन, अन्नपाणी व औषधे घेण्याची विनंती केली. ती त्यांनी नाकारली. इंदिरा गांधी विनोबाजींना १० नोव्हेंबर रोजी भेटल्या. अन्नपाणी, औषधे घेण्याची विनंती त्यांनीही केली. प्रायोपवेशनाचा संकल्प करण्याचे कारण आचार्यांनी श्री. त्र्यं. गो. देशमुख व इतर भक्तांना स्पष्ट करून सांगितले. ते म्हणाले- आता देह आत्म्याला साथ देत नाही. रखडत जगण्यात अर्थ नाही. जराजर्जर शरीर टाकणेच ठीक! १५ नोव्हेंबर १९८२ रोजी आचार्य विनोबा भावे यांचे पवनार वर्धा येथे निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना १९८३ साली मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले.

**- विकास मेहंदळे,**
मोबा. ९४२०१५५११४

# नुकत्याच झालेल्या श्री गणेश जयंतीच्या निमित्ताने...

एक प्रसिद्ध आख्यायिका आहे की, व्यासांनी श्रीगणेशाला महाभारत लिहिण्यासाठी लेखनिक होण्याची विनंती केली. लिहिताना मला थांबावे लागू नये अशा प्रकारे सलग मजकूर सांगण्याची अट श्रीगणेशाने घातली. सलग मजकूर सांगताना थोडी सवड मिळावी म्हणून व्यासांनी श्रीगणेशाला प्रतिअट घातली की, त्याने महाभारत लिहिताना नव्या आणि परिपूर्ण अक्षरसंचासह आणि नव्या परिपूर्ण लेखन पद्धतीने लिहिले पाहिजे.

श्रीगणेशाने ही अट पाळताना व्यासांच्या उच्चारांचे नीट अवलोकन केले. उच्चारांशी सुसंगत अक्षरचिन्हे निवडली. लेखन वेगाने होण्यासाठी श्रीगणेशाने जोडाक्षर पद्धती विकसित केली. श्रीगणेशाने तेव्हा विकसित केलेल्या लेखन पद्धतीत काही बदल होत होत आजची मराठी देवनागरी लिपी उपलब्ध झाली आहे. ही उपलब्ध लिपी अतिशय शास्त्रीय आहे. जगातील सर्व मानवांना तेहेतीस मणके असतात. या तेहेतीस मणक्यांशी या देवनागरी लिपीतील तेहेतीस चिन्हे एकास एक संगतीने जुळलेली आढळतात, त्यांना सध्या मराठी देवनागरी लिपीतील तेहेतीस व्यंजनचिन्हे म्हणून ओळखले जाते. मणक्यांच्या वरील भागातील मुखाशी संबंधित सोळा उच्चारांशी सोळा अक्षरचिन्हे जुळलेली आहेत त्यांना मराठी देवनागरी स्वरचिन्हे म्हणून सध्या ओळखले जाते. या चिन्हांच्या सहाय्याने श्रीगणेशाने जोडाक्षर पद्धतीही विकसित केली. यासह तीन संयुक्त व्यंजनचिन्हेही श्रीगणेशाने निर्माण केली. श्रीगणेशाने ही सर्व बावन्न चिन्हे ॐ या बीजाक्षराच्या विविध अवयवांपासून निर्माण केली होती. या बावन्न चिन्हांचा उपयोग करून २०७३७ दोन अक्षरी जोडाक्षरे, ७४६४९६ तीन अक्षरी जोडाक्षरे, २६८७३८५६ चार अक्षरी जोडाक्षरे, ९६७४५८८१६ पाच अक्षरी जोडाक्षरे निर्माण होतात. श्रीगणेश या देवाने हा अक्षरसंच व लेखन पद्धती निर्माण केली आणि ती नागरिकांच्या वापरासाठी खूपच सोयीची ठरली म्हणून कोणीतरी विद्वानाने या व्यवस्थेला देवनागरी लिपी हे नाव दिले. या लिपीतील ग , ण , श ही तीन अक्षरचिन्हे या लिपीतील इतर चिन्हांपेक्षा वेगळी आहेत. या तीन चिन्हांच्या बाराखडीतील पहिल्या स्थानी सुद्धा काना आहे. ग,ण,श या तीन अक्षरांचे हे वेगळेपण, ही स्वर व्यंजन व्यवस्था गणेश या देवतेनेच निर्माण केल्याचे सूचक मानून श्रद्धाळू गणेशभक्त देवनागरी लिपीला गणेशविद्या म्हणतात.

गणेशविद्या या चिन्ह व्यवस्थेत स्थळ, काळानुरूप बदल होत होत सध्या वापरात असलेल्या मराठी, हिंदी, तमिळ, कन्नड, बांग्ला, उडिया, मल्याळी, तेलुगू, गुजराती, पंजाबी, शारदा लिप्या विकसित झाल्या आहेत. श्रीगणेशाने मानवाला दिलेल्या या वैज्ञानिक लेखन व्यवस्थेची माहिती गणेश चतुर्थी निमित्त सर्व जगापर्यंत पोचवावी हे आवाहन!

सर्वांना गणेश जयंतीच्या हार्दीक शुभेच्छा ! तुमच्या मनातील सर्व मनोकामना पूर्ण होवोत, सर्वांना सुख, समृध्दी, ऐश्वर्य, शांती, आरोग्य लाभो हीच बाप्पाच्या चरणी प्रार्थना !

**गणपती बाप्पा मोरया , मंगलमुर्ती मोरया !!!**

● Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly ●
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027

**SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.**

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.